## Lokvrutta News's post

**Lokvrutta News**
12m ·

लहान वयातच सायबर साक्षरता: Academic Heights च्या विद्यार्थ्यांना 'सायबर वॉरियर्स'चे मार्गदर्शन

कराड: सध्याच्या काळात अभ्यास, संवाद आणि मनोरंजनासाठी इंटरनेटचा वापर वेगाने वाढला असून, विद्यार्थी लहान वयातच स्मार्टफोन व सोशल मीडियाद्वारे डिजिटल जगाशी जोडले जात आहेत. हीच बाब लक्षात घेऊन Academic Heights Public School, कराड येथे विद्यार्थ्यांसाठी विशेष सायबर जागरूकता उपक्रम आयोजित करण्यात आला होता. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड येथील 'सायबर शक्ती क्लब'च्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

'माझी माहिती, माझी जबाबदारी' संदेशावर भर उपक्रमात 'माझी माहिती, माझी जबाबदारी' हा संदेश केंद्रस्थानी ठेवून विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे महत्त्व पटवून देण्यात आले. फिशिंग संदेश, अज्ञात लिंक्स, सोशल मीडिया खाते हॅक होणे, वैयक्तिक माहितीची चोरी, तसेच बक्षीस व ऑफरच्या नावाखाली होणाऱ्या फसवणुकीबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. कोणतीही अज्ञात लिंक न उघडणे, वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवणे आणि संशयास्पद ऑनलाइन संवादापासून सावध राहणे या सवयी रुजवण्यावर विशेष भर देण्यात आला.

'सायबर वॉरियर्स'चे सोप्या भाषेत मार्गदर्शन सायबर वॉरियर्स अनिकेत ढोत्रे आणि विशाखा गुजर यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधून दैनंदिन उदाहरणांच्या साहाय्याने मार्गदर्शन केले. मजबूत पासवर्डचा वापर, पासवर्ड वारंवार बदलणे, दोन-टप्पी पडताळणी (टू-फॅक्टर ऑथेंटिकेशन), सोशल मीडिया गोपनीयता (प्रिव्हसी) सेटिंग्ज आणि सार्वजनिक वाय-फाय वापरताना घ्यायची खबरदारी याबद्दल त्यांनी सोप्या भाषेत माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त प्रश्नांमुळे सत्र अत्यंत संवादात्मक ठरले.

सुरक्षित इंटरनेट वापराचा निर्धार शाळेचे संचालक संजय जाधव आणि प्राचार्य सजाद मीर यांनी या प्रसंगी मार्गदर्शन करताना नमूद केले की, शालेय वयातच सुरक्षित इंटरनेट वापराची सवय रुजवणे ही आजच्या काळाची मोठी गरज आहे. या उपक्रमाला शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराडचे प्राचार्य डॉ. संजीव वाघ यांचे मार्गदर्शन लाभले, तर 'सायबर शक्ती क्लब'च्या शिक्षक समन्वयक प्रा. डॉ. प्रियांका शिंदे यांनी कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले. उपक्रमानंतर विद्यार्थ्यांनीही ऑनलाइन जगतात वावरताना अधिक सजग आणि जबाबदार राहण्याचा निर्धार व्यक्त केला.




1 · 1 share

Like · Comment